प्रकरण पहिले

# नागरीकरण म्हणजे काय? आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या

प्रकरण पहिले

# नागरीकरण म्हणजे काय? आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधनाचा हेतू

१.३ संशोधन पद्धती

१.४ नागरीकरण म्हणजे काय?

१.५ शहरीकरण आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या

१.६ संदर्भ

प्रकरण पहिले

# नागरीकरण म्हणजे काय? आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या

## १.१ प्रस्तावना -

कराड (ग्रामीण) या भागाला त्रिशंकू, गुंठेवारी किंवा अधांतरी अशा अनेक नावांनी ओळखले जाते. कराड शहराला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. धार्मिक, आर्थिक आणि राजकीय अशा विविध व्यवस्थांचे केंद्र म्हणून शहराचा उल्लेख करता येण्याजोगे पुरावे उपलब्ध आहेत. शहराचे भौगोलिक स्थान, रचना, प्राचीन वास्तू, इमारती, स्थळे, प्रार्थना स्थळे इ.चा अभ्यास केल्यास तसे जाणवते.

कराड शहर हे कृष्णा व कोयना या नद्यांमुळे सुजलाम् सुफलाम् बनलेल्या खोऱ्यात वैभवशाली शहर आहे. शहराच्या पश्चिम, उत्तर, वायव्य व ईशान्य या भागातून वाहणाऱ्या या दोन नद्या तसेच या दोन्ही नद्यांचा संगम यातून कराड शहराच्या परिसराचा कायापालट झालेला दिसून येतो.

शहराच्या उत्तरेला असलेली मंदिरे, कृष्णाबाईचा घाट व मंदिर, उत्तरालक्ष्मीचे मंदिर, संत सखूबाईचे मंदिर, जोतिबाचे मंदिर, जामा मस्जिद व दोन मनोरे, शाही कब्रस्थान मधील भव्य ईदगाहची भिंत, गोल घुमट, खाजा खिजरची दर्गा, इमाम हुसेन यांची दर्गाह, गोळेश्वर येथील मलेकाची दर्गा, आगाशिव डोंगरावर असलेल्या बौद्धकालीन लेण्या, नकट्या रावळ्याची विहिर इत्यादी ऐतिहासिक वास्तू पाहिल्यानंतर कराड शहर हे विविध स्थळांचे केंद्र असल्याचे जाणवते. तसेच कराड वर विविध राजकीय व्यवस्थांचा अंमल होता, असे स्पष्ट होते. किंबहुना तशी नोंद शासकीय गॅझेटियरमये सापडते. कराड ग्रामीणचा अभ्यास करताना या सर्व गोष्टींची नोंद घेणे अपरिहार्य ठरते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे कराड शहराच्या पश्चिम, उत्तर, वायव्य व ईशान्य या दिशांना कृष्णा व कोयना नद्यांचा पूर्णपणे वेढा पडल्याने त्या दिशांना शहर हद्द वाढ

नैसर्गिकपणे थांबते. बदलत्या काळानुसार व शहरातील विविध कारणांनी वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शहरात राहण्यासाठी जागा अपूरी पडू लागल्यामुळेच शहर हद्दीबाहेर वसाहती वाढू लागल्या. शहरीकरण आणि वाढत्या लोकसंख्येमुळे शहराच्या पूर्वेला आणि दक्षिणेला लोकवस्ती झपाट्याने वाढू लागली. या सर्व वस्त्या, वसाहतींमध्ये कोणतेही नियोजन नसल्यामुळे बेशिस्त, बकाल आणि अनियंत्रित अशा गैरसोईंनी बजबजलेल्या वस्त्यांची वाढ होऊ लागली. या वस्त्यांना कराड शहरात सामावून घेण्यासाठी कराड नगरपालिकेने १९६१ पासून प्रयत्न सुरू ठेवले आहेत. परंतु त्यास आजपर्यंत यश आलेले नाही. दरम्यान १९७५ साली मलकापूर आणि गोटे या स्वतंत्र ग्रामपंचायती निर्माण झाल्याने उरलेला भाग कराड (ग्रामीण) मध्ये सहभागी झाला. त्यामुळे हा भाग आजअखेर कोणत्याही ग्रामपंचायत अथवा नगरपालिकेच्या हद्दीत विकास प्राधिकरण अथवा विकासाला जबाबदार शासकीय यंत्रणा उभी राहिली नाही. त्यामुळे या परिसराची दैन्यावस्था, बकालपणा व विद्रूपपणा वाढत गेला. या संपूर्ण परिसरातील समस्या जाणून घेणे आणि त्यावरील उपाययोजनांचा टिकात्मक अभ्यास करणे हा माझा संशोधनाचा विषय आहे.

## १.२ संशोधना उद्देश (हेतू) -

कराड (ग्रामीण) मध्ये राहणाऱ्या नागरिक या नात्याने कराड शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांचे राहणीमान, त्यांना मिळणाऱ्या सोई, सुविधा आणि त्यांच्या मोबदल्यात मोजावी लागणारी किंमत आणि त्यांच्याच शेजारी हाकेच्या अंतरावर असणाऱ्या कराड ग्रामीण मधील नागरिकांची दैन्यावस्था यांचा ज्यावेळी सामान्य नागरीक तौलनीक अभ्यास करतो त्यावेळी त्या दोन्ही परिस्थितीत जमीन आसमानचा फरक असल्याचे जाणवते आणि मग त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. आणि मग या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात सदर संशोधन विषयाचा जन्म झालेला आहे.

१. कराड ग्रामीण हा अधांतरी भाग का व कसा निर्माण झाला? त्याला कोणकोणत्या समस्या, घटना-घडामोडी कारणीभूत ठरल्या याचा शोध घेणे.

२. सदरचा अधांतरी, त्रिशंकू भाग कराड शहराच्या हद्दीमध्ये समाविष्ट व्हावा यासाठी नगरपालिकेने प्रयत्न केले का?

३. हा परिसर वसत असताना कराड नगरपरिषद, राज्य सरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच लोकप्रतिनिधींच्या विकास निधींच्या माध्यमातून विकास कसा व किती झाला याचा अभ्यास करणे.

४. कराडच्या राजकारणाचा या परिसरावर कोणता परिणाम झाला याचा अभ्यास करणे.

५. या परिसरातील लोक ज्या विविध नागरी समस्यांना तोंड देत आहेत. त्या समस्यांचा, गैरसोईंचा बारकाईने अभ्यास करणे.

६. या परिसराचा विकास होण्यासाठी आवश्यक असलेले मार्ग शोधून काढणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

कराड शहराचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वांगाने अभ्यास केल्यास एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे कराड हा सर्वांगाने सुजलाम्, सुफलाम्, संपन्न आणि समृद्ध असा परिसर असताना त्याच्याच शेजारी असणारा ग्रामीणचा भाग मात्र अविकसित आणि मागासलेला का राहावा? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची जिज्ञासा हा संशोधन प्रपंचाचा हेतू आहे.

प्रस्तुत प्रबंधाचा हेतू कराड (ग्रामीण) म्हणून ओळखला जाणारा असा भूभाग की जो कोणत्याही नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये समाविष्ट नाही. या भागातील नागरी समस्यांचा सखोल व टिकात्मक अभ्यास करणे तसेच हा भाग निर्माण झाल्यापासून आजवर शासनसंस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, कराड नगरपरिषद तसेच विविध लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीतून या परिसरामध्ये कोणती विकासकामे झाली यांचा अभ्यास करून तेथील समस्यांवर उपाययोजना सुचविणे हा आहे.

या प्रबंधासाठी सामाजिक संशोधन पद्धती व ऐतिहासिक संशोधन पद्धती यांचा स्वीकार करणेत आला आहे. सामाजिक संशोधनासाठी इतिहास हा महत्त्वाचा स्त्रोत आहे. इतिहासाच्या मदतीने एखादी व्यक्ती, वास्तू अथवा सामाजिक संस्थांचा विकास, त्यात झालेले बदल, प्रगती आपण तपासून पाहू शकतो. काही महत्त्वपूर्ण समाज शास्त्रज्ञांनी वर्तमानातील दृष्टिकोन, घटना यांचा भूतकाळातील अनुभवाची जोड दिली आहे.

शोध प्रबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करताना त्या कालखंडातील उपलब्ध कागदपत्रे, बखरी, रोजनिशी, आत्मचरित्रे, डायऱ्या, वृत्तपत्रे, पत्रव्यवहार इत्यादी बाबींचा समावेश करावा लागतो. आर्थर स्लेसिंजर म्हणतात, "सामाजिक शास्त्रज्ञ तर सोडाच, पण कोणताही व्यक्ती भूतकाळाचे आनुबाहू कधीच दुर्लक्षित करू शकणार नाही." साहजिकच यावरून हे स्पष्ट होते की, जेथे भूतकालीन घटनांची चिकित्सा अनिवार्य पण केली जाते. तेथे ऐतिहासिक संशोधन पद्धतीची गरज ही अनिवार्य ठरते.

कराड ग्रामीणमध्ये शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या आणि नागरी प्रशासनाचा अभ्यास करताना संशोधन प्रबंध, वृत्तपत्रातील बातम्या, नगरपालिका, ग्रामपंचायतीचे वार्षिक अहवाल, प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, सरकारी अहवाल, गॅझेटिअर इ. प्राथमिक आणि दुय्यम सामग्रीचा वापर करणेत येणार आहे.

## १.३ संशोधन पद्धती -

प्रस्तुत प्रबंधातून कराड ग्रामीण परिसरातील नागरी समस्यांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्या समस्यांचा नागरी समाजावर होणाऱ्या परिणामांचा व त्यावर कोणत्या उपाययोजना करता येतील यांचा इथे अभ्यास केला जाणार आहे. या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग करणेत येईल.

नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायती यांचे अहवाल, ठराव इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल. स्थानिक वर्तमानपत्रातील बातम्या, त्या परिसरातील राजकीय कार्यकर्ते, नेते, समाजसेवक, प्रशासकीय अधिकारी, नागरीक, विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या मुलाखती घेऊन या विषयाचा सखोल अभ्यास करणेत येईल. त्याचप्रमाणे विविध दृष्टिकोनातून ज्या समस्या आहेत. त्यांचा शोध घेणेत येईल.

## १.४ नागरीकरण म्हणजे काय?

नागरीकरण आणि शहरीकरण या एकाच अर्थाने वापरल्या जाणाऱ्या मराठी भाषेतील संज्ञा आहेत. Urbanization या इंग्रजी शब्दाला मराठीत दोन पर्यायी शब्द असल्याचे दिसते. नागरीकरण किंवा शहरीकरण म्हणजे काय? हे पाहण्याआधी या शब्दाची उत्पत्ती कशी झाले हे पाहणे क्रमप्राप्त ठरते. शहर या शब्दाला इंग्रजीत Urban म्हणतात. Urbanization हा शब्द Urbs या लॅटीन भाषेतील शब्दापासून तयार झालेला आहे. लॅटीन भाषेत Urb या शब्दाचा अर्थ शहर किंवा नगर असा आहे आणि या नगर किंवा शहरासंबंधी Urban असा शब्दप्रयोग केला जातो. शेती आणि शेतीपूरक असा बहुतांश लोकांचा व्यवसाय असलेला लोकसमुदाय म्हणजे ग्राम किंवा गाव होय. अशा गावाची सर्वांगीण प्रगती होऊन उद्योगधंदे, व्यापार व शेती व्यतिरिक्त व्यवसायामध्ये लोकांचा जास्तीत जास्त सहभाग होऊ लागला. तसेच अनेक सेवा, सवलती, सोई निर्माण होऊ लागल्या आणि शहराचा मुखवटा चढू लागला की त्यास नागरीकरण (Urbanization) म्हणतात.

नागरीकरणाचा वेग विकसित राष्ट्रात प्रचंड प्रमाणात दिसून येतो. विकसनशील राष्ट्रात त्यामानाने हा वेग कमी असला तरी तुलनेने भारतात हा वेग नोंद घेण्याजोगा असल्याचे दिसते. म्हणजे हा वेग इतका आहे की शहर आणि खेडे यातील सीमारेषा पुसट होत चाललेल्या दिसतात. शहरांचे वाढते आकारमान आणि क्षेत्रफळाचे आजूबाजूच्या, लगतच्या खेड्यांना गिळंकृत केले आहे.

नागरीकरण किंवा शहरीकरण ही सार्वत्रिक स्वरूपाची अव्याहतपणे चालणारी प्रक्रिया आहे. जगातील सर्व देशामध्ये कमी-अधिक प्रमाणात नागरीकरण चालू असल्याचे दिसते. पृथ्वीच्या पाठीवर फार पूर्वी पासून शहरे अस्तित्वात असल्याची दिसतात. परंतु त्या शहरांची वाढ व विकास व हेतू आजच्या शहरांच्या तुलनेने वेगळा होता. पाश्चिमात्य देशात औद्योगिक क्रांतीनंतर या प्रक्रियेची सुरूवात झाली.

१. भारतात मात्र ब्रिटिश राजवटीत यांत्रिकीकरणाचा पाया घातला गेला. स्वयंचलित यंत्रे, वाफ, कोळसा, तेल, वीज, अणूशक्तीच्या साहाय्याने चालू लागली. कृषी आणि कृषी पूरक व्यवसायाव्यतिरिक्त कापड, कागद, सिमेंट, पोलाद, औजारे, वाहतूकीची साधने यांसारख्या असंख्य वस्तूचे उत्पादन सुरू झाले. या सर्व उत्पादनांचे केंद्रीकरण सर्व सुविधा व सोई सवलतीयुक्त अशा प्रदेशात अर्थातच शहरात झाले. त्यामुळे शहराकडे नोकरी, रोजगार, मजूरी या निमित्तने लोकांचा लोंढा वाढला आणि त्यातून शहरीकरणाला सुरूवात झाली.

२. नागरीकरण किंवा शहरीकरण या संकल्पनांचा अभ्यास करताना ‘नगर’ किंवा ‘शहर’ म्हणजे काय? हे तपासून पाहणे गरजेचे वाटते. नगर म्हणजे काय? किंवा शहर कशाला म्हणावे? याविषयी देशपरत्वे विविध व्याख्या अस्तित्वात आहेत. त्यामुळे सर्वसामान्य अशी व्याख्या कुठेही आढळत नाही. अमेरिकेत २५०० पेक्षा जास्त वस्ती असलेल्या वसाहतीला नगर म्हणतात. फ्रान्समध्ये ही मर्यादा २००० आहे. जपानमध्ये ३०,००० तर भारतामध्ये ५००० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या वसाहतीला नगर म्हणतात.

३. भारतामध्ये १९८१ च्या जनगणनेत शहराची व्याख्या खालीलप्रमाणे स्वीकृत करण्यात आली. त्यानुसार नगरासाठी

१. दर चौ.मै. ४०० पेक्षा अधिक लोकसंख्येचे घनत्त्व असावे.

२. लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त असावी.

३. कृषी व्यवसाय सोडून इतर व्यवसायात एकूण लोकसंख्येच्या ७५% लोकसंख्या गुंतलेली असावी.

४. त्या समुदायात नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी संस्थांचे प्रचलन असावे.

वरील व्याख्येचा परामर्श घेतला असता एक गोष्ट जाणवते. ती म्हणजे केवळ लोकसंख्या व घटक केंद्रीभूत मानून नगर किंवा शहराची व्याख्या करता येणार नाही. कारण भारतामध्ये ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली खेडी आहेत, तसेच लोकसंख्येचे घनत्व ४०० पेक्षा जास्त असलेली खेडीदेखील आहेत. परंतु त्या ठिकाणी शहर किंवा नगराची इतर कोणतीच लक्षणे दिसून येत नाही. त्यामुळे नगराची व्याख्या करताना उपरोक्त सर्व घटक प्रमाणभूत मानूनच शहराची व्याख्या करणे उचित ठरेल.

भारतामध्ये नागरीकरणाची सुरूवात ब्रिटिश कालखंडामध्ये झाली असली तरी खऱ्या अर्थाने सुरूवात ब्रिटिश स्वातंत्र्योत्तर कालखंडातच झाली. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यव्यवस्थेने देशाचा आर्थिक चेहरा मोहरा बदलण्याच्या उद्देशाने पंचवार्षिक योजनांचा स्वीकार केला. त्या अनुषंगाने भारतात औद्योगिकरणास सुरूवात झाली व भारतात नागरीकरणास चालना मिळाली.

नेल्सन अंडरसन यांनी नागरीपणाची वैशिष्ट्ये नमूद करताना म्हटले की, परिवर्तन शीलता हे नागरीयतेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ज्या समाजात सतत बदल होत आहे. या बदलामुळे समाजाची पूर्वीची स्थिर अवस्था नष्ट होऊन गतिशील अवस्था निर्माण होते.[५] शहरीकरणाचा वेग हा विकसित राष्ट्रात जास्त असला तरी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात त्याचा वेग नोंद घेण्यासारखा आहे. १९०१ च्या जनगणनेनुसार भारतात शहरांची संख्या १८३४ होती. १९५१ साली २२४४ तर १९८१ साली ३२४५ तर १९९१ साली ४७०० एवढी शहरे निर्माण झाली. यावरून शहरीकरणाचा वेग भारतात देखील अधिक असल्याचे दिसते.

शहर किंवा नगर या शब्दाची उत्पत्ती अर्थ व्याख्या पाहिल्यानंतर शहरीकरण या संज्ञेचा अर्थ व्याख्या तपासून पाहणे क्रमप्राप्त ठरते.

नागरीकरण बहुअंगी, परिवर्तनशील व गतीशील प्रक्रिया असून या संकल्पनेमध्ये उद्योगशीलतेमुळे ग्रामीण भागाचे, तेथील व्यवसायाचे, उत्पादनाचे व एकूण संपूर्ण जीवनपद्धतीचे आमूलाग्र बदलाची अपेक्षा असते.[७] लोकसंख्येमध्ये सापेक्ष व निरपेक्ष पद्धतीने वाढ होऊन या मोठ्या शहरांमधून विविध नगरे अथवा मोठी शहरे निर्माण होऊन या मोठया शहरांमधून विविध जाती धर्मांचे लोक एकत्रित येतात व या कॉसमॉपॉलिटन गुणधर्मामुळे येथील लोकांमध्ये सामाजिक बदल होतो. लोकांचे दृष्टिकोन, सामाजिक मूल्य व वर्तणूक बदलणे यालाच नागरीकरण म्हणतात.

नागरीकरणाचा पाया औद्योगिकरणामध्ये आहे. पारंपारिक पद्धतीने कृषी क्षेत्रात काम करणारे लोक श्रमावरील सर्व परंपरागत बंधने नष्ट करून श्रमास एक क्रमवस्तू बनविल्याखेरीज औद्योगिकरणास गती मिळत नाही. याचसाठी श्रमसंबंधीचा परंपरागत दृष्टीकोन बदलून त्याऐवजी औद्योगिकरणास पोषक असा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला तरच परंपरानिष्ठ समाजामधील औद्योगिकरणाची गती वाढू शकते.[८] औद्योगिकरणाच्या याच गतीमुळे शहरीकरणाला चालना मिळत जाते. शहरीकरण किंवा नागरीकरण या संकल्पनेच्या व्याख्येसंबंधी विचारवंतांमध्ये मतैक्य दिसून येत नाही हे खालील व्याख्यांवरून स्पष्ट होते.

**मार्विन ओल्सन -**

> "नागरीकरण प्रक्रियेमध्ये भावेतालच्या विस्कळीत ग्रामीण भागातून नागरी वसाहतीकडे असंख्य लोकांचे स्थलांतर होणाऱ्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात."[९]

**थॉम्पसन -**

"कृषी व्यवसायाशी संलग्न खेड्यातील लोकसंख्या जेव्हा व्यापार, उद्योग व शासकीय व्यवहार असलेल्या मोठ्या समूहाकडे स्थलांतरित होतात त्या प्रक्रियेला नागरीकरण म्हणतात."[१०]

**क्लाईड मिचेल -**

"जेव्हा मोठ्या संख्येने लोक खेड्यातून शहराकडे येतात. शेतीचा व्यवसाय सोडून, यंत्रोत्पादनाचा स्वीकार करतात. आपल्या सवयी बदलतात आणि तेथील अनुषंगाने आपली राहणी बदलण्यास सुरूवात करतात त्यालाच नागरीकरण असे म्हणतात."[११]

**स्टॅम्प -**

"कृषी व्यवसायाशी संलग्न असलेल्या लहान समुदायाचे वस्तूनिर्माण उद्योग, व्यापार व्यवस्थापन व तत्सम उद्योगात असणाऱ्या मोठ्या समुदायाकडे लोकांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर घेण्याच्या प्रक्रियेला नागरीकरण म्हणतात."[१२]

**संयुक्त राष्ट्रसंघ -**

"नागरीकरण हे ग्रामीण वसाहतींचे, व्यवसायाचे व उत्पादनाचे आणि एकूण सामाजिक जीवन पद्धतींचे स्थलांतर असते."[१३]

अशा प्रकारे विविध अभ्यासक व विचारवंतांनी नागरीकरणाच्या विविध व्याख्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व व्याख्यांचा परामर्श घेतला असता नागरीकरणाची काही वैशिष्टये आपणास पाहावयास मिळतात. ती पुढीलप्रमाणे-

१. नागरीकरण ही सार्वत्रिक स्वरूपाची प्रक्रिया असून सफल आणि कालपरत्वे तिचा वेग कमी अधिक प्रमाणात दिसून येतो.

२. नागरीकरण ही हळूवार चालणारी प्रक्रिया असली तरी तिचा वेग सर्व ठिकाणी सारखा नसतो.

३. नागरीकरण ही सदैव चालणारी बहुअंगी, परिवर्तनशील व गतीशील प्रक्रिया आहे.

४. नागरीकरण ही संकल्पना प्राचीन असली तरी औद्योगिक क्रांतीनंतर मात्र तिला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले.

५. नागरीकरणामध्ये लोक कृषी व कृषी पूरक असा व्यवसाय सोडून देवून उत्पादन उद्योग, व्यापार, व्यवस्थापन अशा व्यवसायात समाविष्ट होतात.

६. नागरीकरणामुळे व्यक्तीच्या व्यक्तीगत व सामाजिक जीवनामध्ये आमूलाग्र बदल होतात. त्यांच्या विविध धर्म, जात, वंश, भाषेच्या लोकांशी संपर्क येतो. त्यामुळे त्यांची विचार पद्धती, चालीरीती, स्वभाव बदलतो.

अर्थात दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ग्रामीण भागातून शहरांकडे लोकसंख्येचे स्थलांतर म्हणजे शहरीकरण होय. शहरात विविध सुखसोई, सेवा, सवलती असतात. उद्योग, व्यापार, व्यवसाय, शिक्षण तसेच शासकीय कार्यालये केंद्रित झालेली असतात त्यात काम करण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोकांचे स्थलांतर होवू लागले म्हणजे शहरीकरण प्रत्ययास येतो. शहरीकरणात फक्त ग्रामीण भागातूनच लोकसंख्येचे स्थलांतर होते असे नाही. तर लहान शहरातून मोठ्या शहरात लोक जातात. ही प्रक्रिया सतत चालू असते. त्यामुळे शहरांचा आकार वाढतो, काही गावांच्या परिसरात औद्योगिक विकास घडून कास म्हणजे त्यात काम करण्यासाठी इतर समूदायातून हजारो लोक स्थलांतरित होतात व त्या गावाचे शहरात रूपांतर होते. कोल्हापूर, सातारा, कराड यासारखी शहरे त्याच शहरातून विकसित झाली आहेत.

## १.५ शहरीकरण आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या -

औद्योगिकरण आणि शहरीकरण या एकमेकांना पूरक अशा संकल्पना आहेत. किंबहुना औद्योगिकरण आणि नागरीकरण या परस्परांच्या हातात हात घालून येणाऱ्या

प्रक्रिया आहेत. नागरीकरण ही निरंतर सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. शहरी भागात असणाऱ्या विविध सेवा सवलती आणि सोई सुविधांमुळे औद्योगिकरण हे नेहमी शहरांच्या जवळपासच होत असतो. औद्योगिकरणामुळे शहराची लोकसंख्या अफाट वाढते. घनदाट लोकवस्त्या निर्माण होतात आणि त्यामुळे मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या अनेक समस्यांचा जन्म होतो. शहरीकरणास कारणीभूत ठरलेली सर्वात प्रथम आणि महत्त्वाचा घटक म्हणजे औद्योगिकरण होय. औद्योगिकरणामुळे घडून येणारा पहिला महत्त्वपूर्ण बदल म्हणजे समाजाच्या जी विकोपार्जी अवस्थेचे (Subsistence economy) व्यापारप्रधान व बाजाराभिमुख (Market Oriented) अर्थव्यवस्थेचे रूपांतर होत जाते.[१४] शहरीकरणालगतची खेडी, वस्त्या आणि शहर यातील सीमारेषा अस्पष्ट होत जातात व चरितार्थाची साधने, विचार प्रवृत्ती यामध्ये आमूलाग्र बदल होत जातात. शहरांचा क्षेत्रीय विस्तार मर्यादित असल्यामुळे शहरांनी आसपासच्या खेड्यांना गिळंकृत केले आहे. औद्योगिक क्रांती, नागरीकरणामुळे मानवी जीवनात परिवर्तन घडून आले. किंबहुना औद्योगिकरण व शहरीकरण हे मानवी समाजाच्या परिवर्तनाचे आणि प्रगतीचे एक लक्षण म्हणून त्याकडे पाहिले जाते. जरी असे परिवर्तन आणि प्रगती घडून आली तरी त्याबरोबर निर्माण झालेल्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आणि या समस्यांची गंभीरता आणि जटिलता एवढ्या प्रचंड प्रमाणात आहे की त्या कशा प्रकारे सोडावाव्यात हीच एक समस्या शासनापुढे उभी ठाकली आहे. नागरी समस्याचे यथार्थ वर्णन करताना प्रसिद्ध विचारवंत ममफोर्ड यांनी असे म्हटले आहे की "मोठी शहरे आर्थिकदृष्टया कमकुवत, राजकीयदृष्ट्या अस्थिर, जैविकदृष्ट्या घट्ट आणि सामाजिकदृष्ट्या समाधानकारक सतत आढळलेली आहेत."[१५]

शहरीकरणामुळे ज्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यातील महत्त्वाच्या समस्या खालीलप्रमाणे -

१. शहरीकरण किंवा नागरीकरण ही मानवाच्या जिवित-वित्ताशी निगडीत असलेली प्रक्रिया होय. नागरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये अमूल्य हाच महत्त्वपूर्ण घटक असतो. त्यामुळे नागरीकरण होत असलेल्या शहरांमध्ये भरमसाट, अनिर्बंध आणि अमर्याद लोकांची वाढ ही एक प्रमुख समस्या बनली आहे. शहरांमध्ये नोकरी, रोजगार, करमणूक व उपजीविकेची साधे उपलब्ध होतात. या आशेने मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून शहरांकडे लोकांचे तांडे स्थलांतर करीत असतात. त्यामुळे शहरांच्या लोकसंख्येत भरमसाट वाढ होणे, ही अपरिहार्य बाब आहे. परंतु त्याप्रमाणात किंवा तेवढ्या लोकांना सामावून घेण्यासाठी आवश्यक असलेला क्षेत्रीय विस्तार शहरांचा नसतो. त्यामुळे शहरांची लोकसंख्या घनता प्रचंढ वाढली आहे. शहरातून लोकसंख्येची घनता उच्चांकी आहे. उदा. कलकत्त्यामध्ये दर चौ.कि.मी. ला ३०,००० मुंबई शहरामध्ये दर चौ.किमीला ४५,७९७ तर मुंबई उपनगरामध्ये १२,६४० आढळते.[१६]

लोकसंख्यावाढ ही संपूर्ण भारतासमोरील एक बिकट समस्या असली तरी ती शहराच्या ठिकाणी प्रकर्षाने जाणवते. शहरात असणाऱ्या सोई, सुविधांवर अनिश्चित ताण पडतो व त्यातूनच अनेक समस्यांचे पेव फुटते. शहरांच्या वाढत्या लोकसंख्येचा आलेख पाहिला असता हे किती भीषण संकट आहे याची जाणीव होते.

उदा. - १९८१ मध्ये ६२,४३,४०५ एवढी शहरी लोकसंख्या होती. १९९१ मध्ये तर १,२५,७०,००० व २००१ मध्ये १,६५,९०,००० एवढी झाली.[१७] यावरून शहरांच्या वाढत्या लोकसंख्येची समस्या किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. कार्ल मार्क्सच्या मते लोकसंख्येची वाढ माणसाच्या प्रजोत्पादन क्षमतेवर अवलंबून नसून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा तो परिणाम आहे. कारण मजुरांचा पुरवठा कमी त्यामुळे मजुरांचे जीवन निकृष्ट व लोकसंख्या झपाट्याने वाढली. भांडवलशाही टिकवण्यासाठी लोकसंख्या घटक महत्त्वाचा आहे.[१८] १७९८ मध्ये माल्थसने लिहिलेल्या एका निबंधात असे वर्णन लिहिले आहे की, कोणत्याही देशाची लोकसंख्येची वाढ भूमितीय मात्रेने होत असते तर अन्नधान्यात होणारी वाढ मात्र अंकगणिती मात्रेने होते.[१९] या

उताऱ्यावरून लोकसंख्येची शहरांमधून होणारी अनिर्बंध वाढ किती गंभीर आहे याची जाणीव होते.

**२. स्थलांतराची समस्या -**

'स्थलांतर' ही शहरीकरणामुळे निर्माण झालेली एक प्रमुख समस्या होय. मानवी इतिहासामध्ये अगदी सुरूवातीपासून स्थलांतराची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असल्याचे दिसते. बदलत्या काळानुसार स्थलांतराची गती आणि हेतू कालपरत्वे बदलताना दिसतो. आधुनिक काळात स्थलांतराचा वेग अधिक असल्याचे दिसते. स्थलांतरामध्ये पुरूषांचे प्रमाण कमी असते. स्थलांतरामध्ये स्त्री-पुरूष प्रमाण असमान असते. १९९१ मध्ये भारतामध्ये १०.३% स्त्रियांनी तर २७.६% पुरूषांनी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर केले.

स्थलांतर याचा शब्दशः अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे असा असला तरी सामाजिक भूगोलमध्ये स्थलांतर या संकल्पनेत दोन ठिकाणामधील अंतर, जाण्याचा हेतू आणि कालावधी या तिन्ही गोष्टींना महत्त्व आहे. एक कायमचे निवासस्थान बदलून दुसऱ्या गावी दिर्घकालीन अथवा कायम वास्तव्यासाठी जाण्याची प्रक्रिया म्हणजे स्थलांतर होय. अधिकृत नोंदीच्या आधारे जागतिक स्तरावर पंधराव्या शतकात प्रथमतः स्थलांतराला सुरूवात झाली. स्थलांतर ही पूर्णतः मानवी घटना असून मानवी वर्तनाचा एक परिघांक आहे. स्थलांतर ही मानवी इतिहास इतकीच प्राचीन प्रक्रिया आहे. विशिष्ट अशा सामाजिक, आर्थिक परिस्थितीमध्ये ही स्थलांतरे झालेली दिसतात.

शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये जसजशी शहरे विकसित होऊ लागतात तसे सभोवतालच्या खेड्यापाड्यातून दुर्गम प्रदेशातून विकसित प्रदेशाकडे स्थलांतर होवू लागते. त्यामुळे खेडी भकास आणि निर्मनुष्य होवू लागला. तसेच, जसजशी यांत्रिक व तांत्रिक प्रगती वाढू लागते. तसतसा स्थलांतरांचा वेग वाढतो. या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये १५ ते ३५ वयोगटातील युवकांचे अधिक प्रमाण असते.

स्थलांतराचे हेतू किंवा कारणे अनेक आहेत. त्यामध्ये सांस्कृतिक स्थलांतर, राजकीय स्थलांतर आणि आर्थिक स्थलांतर असे प्रकार दिसून येतात. त्यापैकी आर्थिक स्थलांतर हे कारण आपल्या अभ्यास विषयास पूरक असल्याने त्याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. प्रत्येक व्यक्तीस आपली आर्थिक स्थिती, जीवनमान, दर्जा सुधारावा समृद्ध आणि संपन्नतेबरोबरच स्वयंपूर्ण जीवनाची अभिलाषा प्रत्येक व्यक्तीच्या मनात असते. त्यादृष्टीने आर्थिक उपलब्धता हा घटक महत्त्वाचा ठरतो. आर्थिक स्थलांतर हे स्वेच्छा स्थलांतर असते. त्यामागे सक्ती किंवा जबरदस्ती नसते. स्थलांतराचा स्थळ व वेळ स्थळातरिताने निर्वाहाकडे असतो. अशा अर्थाजनाच्या हेतूनेच शहरामध्ये स्थलांतराचे प्रमाण वाढते. त्यातून शहरामध्ये घनदाट अशी लोकवस्ती निर्माण होते. लोकसंख्येची घनता वाढते. पर्यायाने शहरातील सर्व सोई सुविधांवरील ताण वाढतो. रहिवासी घरांचा प्रश्न निर्माण होतात.

**३. गलिच्छ वस्त्या आणि झोपड्या -**

शहरीकरण किंवा नागरीकरणाचा आणखी एक परिणाम म्हणजे झोपडपट्ट्या होय. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेत आणि जीवनमानात कंटाळलेले तसेच शहरी जीवनाची, अर्थाजनाची, उत्तम राहणीमान, मनोरंजन, करमणूक इ. अभिलाषा असलेले लोक शहराकडे आपल्या सोयी वळवितात. शहरामध्ये अन्न, वस्त्र या दोन मूलभूत गरजांची पटकन पूर्तता होते. प्रश्न असतो तो निवाऱ्याचा. लोकसंख्येच्या अमर्याद वाढीमुळे घनदाट घनतेमुळे लोक मिळतील त्या जागेवर, फूटपाथवर, नाले, गटारांवर अतिक्रमण करून अवैध छपरे, झोपड्या वसवीतच हा परिसर एवढा गुंतीगुंतीचा व गजबजलेला असतो, की शहर प्रशासन नियोजन करण्यास हतबल होते. पर्यायाने या वस्त्यांमध्ये रस्ते, पथदिवे, गटर, सांडपाणी, दवाखाने, शाळा, आरोग्य, गुन्हेगारी, दारिद्रय असे अनेक बिकट प्रश्न निर्माण होतात. झोपडपट्ट्यांमधील मानवी जीवनाचे विदारक चित्र रेखाटताना एम.के. गुप्ता म्हणतात. "मानवी विषयास अयोग्य अशी घरांची गर्दी असलेली वस्ती म्हणजे झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती होय." विल्यम

फोर्ड यांच्या मते "ज्या परिसरातील घरे राहण्यास निकृष्ट, अपूरी, आरोग्यास घातक असतात. अशा वस्तीला झोपडपट्टी म्हणतात." डेव्हीड हंटर यांनी तर "गलिच्छ वस्त्या किंवा झोपडपट्ट्या म्हणजे नागरी जीवनाला झालेला कॅन्सर होय" असे वर्णन केले आहे.[२१] वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे जीवनमान व राहणीमान किती हलक्या दर्जाचे असेल आणि या संपूर्ण वातावरणमुळे तिथे राहणाऱ्या लोकांच्या कार्यक्षमतेत देखील कमी होताना दिसते. या संदर्भात टी.एन. भागोलीवाल यांनी Economics of Social Welfare या ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की, "भारतात राहणारी श्रमजीवी व्यक्ती गलिच्छ वस्तीत आणि गलिच्छ रितीने राहू लागली तर त्यांच्या कार्यक्षमतेवर त्याचा निश्चित परिणाम होईल"[२२] असे प्रतिपादन केले आहे. यावरून गलिच्छ वस्त्या किंवा झोपडपट्ट्या आणि त्यामुळे राहणारा समाज ही आणि त्यांचे राहणीमान, आरोग्य ही प्रचंड मोठी समस्या म्हणून भविष्यकाळात उभी राहणार आहे.

## ४. रहिवासी जागेची समस्या -

रहिवासी जागेची समस्या आणि झोपडपट्टीची समस्या हे दोन्ही प्रश्न परस्परांना पूरक असल्याचे दिसते. औद्योगिकरणामुळे शहरीकरणाला चालना मिळते. औद्योगिकरण हे विशेषतः शहराच्या आसपास होत असते. औद्योगिकरणामुळे रोजगार, व्यापार, व्यवसाय अर्थात उपजिविकेची साधने उपलब्ध होतात. त्यामुळे ग्रामीण भागातून लोकांचे लोंढे शहराकडे वाढू लागतात. शहरांचा क्षेत्रीय विकास मर्यादित असल्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने आलेल्या लोकांनां सामावून घेण्यास शहरे असमर्थ असल्याने प्रत्येक कुटुंबास राहणेस जागा उपलब्ध होणे केवळ अशक्य असते. राहणेसाठी जागा मिळावी याकरिता प्रत्येकजण प्रयत्नशील हा असतो आणि त्यातूनच जागेच्या किंमती वाढतात. आणि अशा जागा घेणे किंवा घरे घेणे गरीब नव्हे तर मध्यमवर्गीयना सुद्धा अशक्य होवून बसते. त्यातूनच झोपडपट्ट्यांचा जन्म होतो. १८८० मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी २% लोक अधिक वस्ती असणाऱ्या शहरांचे

रहिवासी होते. १९६० मध्ये ८% लोक अशा शहरामधून वस्ती करून राहत होते.[२३] या आकडेवारीवरून मागील दोन दशकात सुद्धा शहरामध्ये राहण्याची लोकांमध्ये प्रचंड इच्छा असल्याचे दिसते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वेक्षणानुसार एकूण जगातील लोकसंख्येच्या ३५.७२% लोक शहरामध्ये वास्तव्य करत असून २१ व्या शतकाच्या सुरूवातीसह प्रमाण ७०% पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. शहरी लोकसंख्या ज्या प्रमाणात व वेगात वाढते ते पाहता त्या प्रमाणात निवासी जागांची उपलब्धता होत नाही. भारतातील नागरी लोकसंख्या १९९१ मध्ये एकूण लोकसंख्येच्या २७% होती. इ.स. २००१ ते २००६ कालापर्यंत ती ३३.५% तर २००६ ते २०११ पर्यंत ४२.५७% अपेक्षित असून त्यामानाने दरवर्षी १७ लाख या वेगाने घरबांधणी झाली तरी प्रत्यक्षात दरवर्षी २ लाख घरे बांधून होतात. वरील आकडेवारी पाहिली असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे शहरीकरणामुळे आज शहरामध्ये राहण्याचा किंवा निवासी जागेचा प्रश्न गंभीर स्वरूपात उभा आहेच. परंतु भविष्य काळात तो अधिक गंभीर व जटिल होणार यात निममात्र शंका नाही. अर्थात शहरीकरणामुळे निवासी जागेचा प्रश्न अधिकाधिक बिकट बनत चालला आहे.

**५. प्रदूषणाचे संकट -**

प्रदूषण हे तीन प्रकारचे आहेत -

१. जल प्रदूषण, २. वायू प्रदूषण, ३. ध्वनी प्रदूषण

शहरीकरणामुळे या तिन्ही क्षेत्रात प्रचंड प्रमाणात प्रदूषण होवून मानवी जीवन धोक्यात आले आहे. औद्योगिकरणामुळे विविध रासायनिक व इतर उद्योगधंदे शहराच्या ठिकाणी निर्माण होतात व त्यातून बाहेर पडणारे द्रवपदार्थ, दूषित पाणी, रसायने, सरळ नद्या, नाले, खाड्या व समुदायाप्रमाणे सोडले जाते. पर्यायाने प्रचंड प्रमाणात जलप्रदूषण होते. त्यातून वापराचे प्रचंड प्रमाणात पेयजल समस्या निर्माण होते. पाण्यातील हे प्रदूषण एवढ्या मोठ्या प्रमाणात असलेली जलशुद्धीकरण प्रकल्प देखील तो प्रदूषितपणा दूर करू शकत नाही. औद्योगिकरण आणि धूर या एकाच नाण्याच्या

दोन बाजू आहेत. औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक प्रकारचे रासायनिक कारखाने, कापड गिरण्या, औषधांचे कारखाने, चामडी उद्योग, रिकायनरी, विटभट्ट्या अशी अनेक उद्योग असतात. या कारखान्यांमधून धूरा बरोबर कार्बनडाय ऑक्साइड, काजळी, राख, सल्फरडाय ऑक्साइड दूषित वायू हवेत मिसळतात. त्याचबरोबर शहरामध्ये असणाऱ्या बसेस, ट्रक, टॅक्सी, स्कूटर, मोटर, सायकली, रेल्वे इ. धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या धुराचे प्रमाण प्रचंड असते. त्यातून मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषित होते. जपानमध्ये प्रदूषणामुळे ठिकठिकाणी ऑक्सिजन पार्क काढावे लागल्याने आपल्याला माहितच आहे. म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात शहरीकरणामुळे प्रदूषण होत असते.

ध्वनीप्रदूषणाच्या बाबतीत थोड्या फार कारणासाठी तीच परिस्थिती दिसून येते. अव्याहतपणे चालू असणारे लाऊड स्पीकर्स, रेडिओ, दूरदर्शन, टेपरेकॉर्डर, कर्कश असे वाहनांचे हॉर्नस, गिरण्या कारखान्यांचे भोंगे, वाहनांचे आवाज, सायरन्स फटाके यामुळे शहरामध्ये ध्वनीप्रदूषण देखील भरपूर असते.

अशा प्रदूषण समस्येमुळे मानव जीवन धोक्यात आलेले आहे. मन, मेंदू, हृदय, रक्ताभिसरण, रक्तदाब, चिंतन, मनन, लेखन, एकाग्रता या सर्वांवर गंभीर आघात करणारी समस्या म्हणून प्रदूषणाकडे पाहिले जाते.

### ७. सामाजिक नियंत्रणाचा प्रश्न -

शहरीकरणामुळे उपलब्ध होणाऱ्या उपजिविकेच्या साधनांमुळे व इतर कारणांमुळे आकर्षिक होवून अनेक प्रदेश, प्रांतातील भिन्न भाषिक, वांशिक व विविध जाती धर्माचे लोक शहराच्या ठिकाणी एकत्र येतात. यामुळे शहरातील लोकसंख्येमध्ये सापेक्ष निरपेक्ष पद्धतीने वाढ होवून नगरे अथवा मोठी शहरी निर्माण होतात. तेथे विविध जाती पंथाचे लोक एकत्र येतात व या कॉसमॉपॉलिटन गुणधर्मामुळे तेथील लोकांच्या आवडी-निवडी, दृष्टीकोन, सामाजिक मूल्य व वर्तणूक बदलते. त्यातून विविध सामाजिक प्रश्न व समाज नियंत्रणाच्या समस्या निर्माण होतात. प्रगतशील

समाजामध्ये शांतता व सुव्यवस्थेची नितांत गरज असते. परंतू समाजात विविधता असल्याने बऱ्याच वेहा समाजात घडणाऱ्या घटना घडामोडींमुळे शांतता व सहजीवन धोक्यात येते. जातीय दंगली, तणाव, दंगे, संघर्ष, भांडणे, होळीयुद्ध यामुळे समाज पोळून निघतो व त्याचा भयंकर परिणाम समाजालाच भोगावा लागतो. किंबहुना राष्ट्रीय एकात्मतेने धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारतायेत नाही. त्यासाठी समाज नियंत्रणाची फार मोठी समस्या निर्माण होत नाही. समाज नियंत्रण म्हणजे काय? याचा अर्थ पाहताना व्यक्तीकडून प्रमाणकांचे अनुकरण करवून घेण्यासाठी समाजाव्दारा व समाजातील गटांव्दारा ज्या प्रक्रिया कार्यान्वित केल्या जातात. त्यास सामाजिक नियंत्रण प्रक्रिया म्हणता येतील. त्यापैकी समाजीकरण हा प्रतिबंधात्मक उपाय आहे. तर समाज नियंत्रण हा उपचारात्मक (Curative) किंवा निवारणात्मक उपाय आहे. समाजामध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे वर्तन, आचरण हे तेथील सामाजिक रूढी, परंपरा, सभ्यता या दृष्टीने सुसंगत असावे. अन्यथा समाजात अशांतता व अस्वस्थता निर्माण होते. व्यक्तीस कार्यनिष्ठ व कार्यतत्पर बनविण्यात प्रयत्नशील असणाऱ्या यंत्रणांचे पार्सन्सचे दोन प्रकार दाखविले आहेत. १) व्यक्तीचे समाजीकरण करणाऱ्या यंत्रणा व २) वर्तन विचलनास नियंत्रण करणाऱ्या सामाजिक नियंत्रण यंत्रणा. समाज कोणताही असो तो समाज नियंत्रित करण्यासाठी सामाजिकरण ही पहिली पायरी तर प्रस्थापित समाज वर्तन विचलित झालेल्या व्यक्तीस नियंत्रण करण्यासाठी समाजात अनेक नियंत्रण यंत्रणा उपलब्ध असतात. जशी पोलिस, सुरक्षाबले, न्यायालये इ. त्याचबरोबर समाजामध्ये अनेक प्रकारच्या संस्था, संघटना असतात. त्याच्यामार्फत देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे समाज नियंत्रणाचे कार्य घडते. पुरस्कार (reward) आणि शिक्षा (punishment) ही सामाजिक नियंत्रणाची दोन अत्यंत व्यापक अशी साधने आहेत. परंतु शहरीकरणामुळे लोकवस्तीचा आकार एवढा महाकाय असतो की समाज नियंत्रणाच्या सर्व पद्धती, प्रक्रिया या अर्थशून्य ठरतात आणि अनियंत्रित, अराजक

प्रवण असा समाज तयार होतो आणि त्यातूनच समाज नियंत्रणाचा मोठा प्रश्न निर्माण होतो.

## ८. शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या -

शिक्षण आणि आरोग्य ही आधुनिक काळातील अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांएवढीच महत्त्वाची गरज बनली आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये अनेक शैक्षणिक समस्या निर्माण झाल्या आहेत. नगराच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या असते. शहरामध्ये खाजगी आणि सरकारी शिक्षण संस्था असतात. त्यांच्या बालवाड्या, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणाची केंद्रे असतात. त्यांची विशिष्ट अशी विद्यार्थी क्षमता असते. त्यामुळे एवढी सर्व विद्यार्थी संख्या त्यात सामावली जाऊ शकत नाही. पर्यायाने काही विद्यार्थी शाळेपासून वंचित राहतात त्यातून बेकारी व गुन्हेगारी वाढते. शहरी शिक्षण हे अतिशय महागडे असते. त्यामुळे योग्यता असतानाही आर्थिक परिस्थितीमुळे गरीब विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश मिळत नाही. त्याचबरोबर शहरामध्ये अनेक प्रदेश, प्रांतातून भिन्न भाषिक विद्यार्थी आलेले असतात. त्यामुळे त्यांच्या मातृभाषेत शिक्षण उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांचा शाळेशी संपर्क तुटतो. वास्तविक पाहता शिक्षण ही मानवी जीवनातील महत्त्वाची बाब, शिक्षणामुळेच व्यक्तीचे आंतर्बाह्य व्यक्तिमत्व उजळते व जबाबदार नागरिक तयार होतो. एवढे शिक्षणाचे महत्त्व असताना देखील नागरी समाजामध्ये शहरीकरणामुळे गंभीर शैक्षणिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

शहरीकरणामुळे निर्माण झालेली आणखी एक मूलभूत समस्या म्हणजे आरोग्याची समस्या होय. शहरीकरणामुळे अनियंत्रित, अमर्याद, घनदाट आणि बकाल लोकवस्त्या निर्माण होतात. प्रशासनाकडून राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा इथे बोजवारा उडालेला असतो. अरूंद आणि चिंचोळे रस्ते, सांडपाण्याची गैरसोय, सवैचालकांची कमतरता, केरकचऱ्यांचे ढिगारे, गटर नाल्यांचा अभाव, व्यसनाधीनता यांसारख्या गोष्टी सगळीकडे दिसून येतात. त्यामुळे डास, माश्या, मच्छर, किटके यांचा

प्रार्दूभाव नागरी झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्यांमध्ये दिसून येतो. त्यामुळे हिवताप, मलेरिया, डेंगू, गॅस्ट्रो, पोलिओ यासारखे रोगांनी पछाडलेल्या लोकवस्त्या दिसून येतात. घनदाट वस्त्यांमुळे खुली व मोकळी हवा अजिबात मिळत नाही. तसेच शुद्ध व पुरेसे पाण्याचा अभाव, सरकारी रूग्णालयांची कमतरता, खाजगी रूग्णालयांचे न परवडणारे दर यातून कुपोषण, ॲनिमिया, यांसारखे रोग निर्माण झाले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस लोकांची कमतरता कमी होताना दिसते.

## ९. कौटुंबिक विसंघटन -

कौटुंबिक विघटन हा शहरीकरणाचा झालेला आणखी एक परिणाम होय. संयुक्त कुटुंब पद्धतीला छेद देवून लहान लहान कुटुंबाची निर्मिती ही नित्याचीच बाब बनली आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे राहण्याच्या जागेच्या टंचाईमुळे मोठे किंवा संयुक्त कुटुंब ही संकल्पना विसंगती दर्शवितो. अर्थार्जनाच्या प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने मुलांवरील प्रेम, संस्कार, आपुलकी या भावना लुप्त होवून केवळ व्यवहार व उपचार उरलेला दिसतो. शहरी समाजामध्ये प्रत्येकजण आपापल्या कामात गुंतलेला असतो. प्रत्येकाच्या कामाचा वेग, कामाचे स्वरूप भिन्न भिन्न असल्यामुळे परस्पर संपर्क कमी झाला. सामाजिक सोडाच पण कुटुंबातर्गत संपर्कदेखील कमी झाला. त्यामुळे आपलुकी, प्रेम, सहकार्य, नातेसंबंध, आदर सन्मान या गोष्टी हळूहळू लुप्त होताना दिसतात. त्यातून एकाकीपणा, नैराश्य, व्यसनाधीनता, अनैतिकता अशा गोष्टींना पोषक वातावरण तयार होते. वास्तविक पाहता कुटुंब संघटन हे प्रभावी सुसंस्कृत आणि अभेदय अशा समाज रचनेचे प्रतिक असते. ध्येयातील एकता, अभिरूचीतील एकता, संतुष्टी हे काही घटक कुटुंब संघटनाला कारणीभूत ठरतात. त्यामुळे कुटुंब संघटीत राहते. परंतु शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे या सर्व गोष्टी हद्दपार झाल्या. त्यातूनच कुटुंब विसंघटनाची समस्या निर्माण झाली.

## १०. प्रशासकीय व नागरी सुविधांची समस्या -

शहरीकरणामुळे ज्या अनेक समस्या निर्माण होतात त्यामध्ये नागरिकांना अत्यंत उपयोगी व दैनंदिन जीवनाशी निगडीत अशी गोष्ट म्हणजे प्रशासकीय व नागरी सोई सुविधा होय. शहरांच्या अक्राळ विक्राळ वाढणाऱ्या लोकसंख्येचे पूरक अशा प्रशासकीय व नागरी सुविधांची पूर्तता करणे ही एक समस्या आहे. जरी शासनाने पुर्तता केली तरी त्यास मर्यादा असतात. शहराची लोकसंख्या दिवसा गणिक वाढत असते. त्यामुळे या सर्व प्रशासकीय सेवा कोलमडून पडतात. वैद्यकीय सुविधा, सरकारी दवाखाने, निबंधकाची कार्यालये, विवाह व जन्म मृत्यू नोंदणी कार्यालये, न्यायालये, रजिस्टर ऑफीस, पोस्ट ऑफीस, रेशनींग दुकाने, सरकारी बँका, वित्तीय संस्था, सेवा नियोजन कार्यालये, टेलीफोन विभाग, बागबगीचे, फलोद्याने व त्याची देखरेख, निगा, नाटयगृहे, विद्युत व पाणीपुरवठा विभाग, नगर रचना कार्यालये, गाव कामगार तलाठी कार्यालये, पोलीस स्टेशन इ. प्रशासकीय व नागरी सोईसुविधा कोलमडून पडतात. त्यातून जनजीवन विस्कळीत होते. विशेषतः पावसाळ्यात या सर्व समस्या प्रचंड प्रमाणात जाणवतात. त्यामुळे नागरीकरण आणि समस्यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

## ११. वाहतुकीची व दळणवळणाची समस्या -

ग्रामीण भागातून शहराकडे वाहणारे लोकांचे लोंढे आणि शहरी समाजात वाहून नेता नेता शहरातील वाहतूक व्यवस्थेची पूरेपूर दमछाक होते. शहरातील अवाढव्य लोकसंख्येची, पुरेशा रस्त्यांचा अभाव, अरूंद आणि चिंचोळे रस्ते, अतिक्रमणे, ट्रॅफिक जॅम, रस्ते खुदाई यामुळे शहरी दळणवळणावर ताण पडतो. मुंबईसारख्या शहरामध्ये लोकल वाहतूक, बेस्टच्या बसेस, टॅक्सी, खाजगी वाहने, दुचाक्या, रिक्षा इ. वेगवान सुविधा असताना तसेच पर्यायी रस्ते, समांतर रस्ते, उड्डाणपूल, सिग्नल व्यवस्था इ. सुविधा असताना देखील वाहतूक आणि दळणवळण म्हणजे मुंबईतील एक मोठी समस्या बनली आहे. रस्त्यांच्या दुतर्फा पादचारी मार्ग असतात. परंतु तेथे देखील स्टॉल

धारक, फेरीवाले, जनावरे यांनी अतिक्रमण केलेले असते. त्यामुळे पादचाऱ्यांना देखील जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. वाहतूक आणि दळणवळणाचा प्रश्न ही शहरीकरणाने जन्मास आलेली समस्या आहे.

**१२. पेयजल व जीवनावश्यक वस्तूंची टंचाई -**

"पाणी म्हणजे जीवन" परंतु सजीव प्राण्याची पहिली गरज पाणी हीच असताना शहरांमध्ये शुद्ध, पुरेपूर व नियमित पाणीपुरवठा होणे अशक्य होऊन बसले आहे. कारण शहरांची प्रचंड वाढती लोकसंख्या, दररोज निर्माण होणारे नवनवीन काखाने, उद्योगधंदे, गगनचुंबी इमारती यांना पुरेल एवढे पेयजलाची उपलब्धता होणे अशक्य असते. प्रत्येक शहरामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेल अशी पाणी पुरवठ्याची व्यवस्था केलेली असते. परंतु शहराचा क्षेत्रीय विस्तार दिवसेंदिवस वृद्धींगत होत चालला आहे. पाण्याची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत जुन्या पाणी पुरवठा साधने निकामी होतात. रस्ते, खुदाईमुळे तसेच पावसाळ्यात पाण्याच्या पाईपा फुटतात व त्यामुळे या प्रत्येकाची प्रचंड मोठी समस्या निर्माण होते. नगरपालिकांनी जागोजागी सरकारी नळे बसवलेली असतात. परंतु सरकारी नळ म्हणजे भांडणे आणि संघर्षाची केंद्रे बनतात. पावसाळ्यात अशुद्ध आणि गढूळ पाण्याचा पुरवठा झाल्याने गॅस्ट्रो, कावीळसारख्या आजरांना नागरिकांना तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंचा अपुरा पुरवठा ही एक समस्या बनली आहे. शहरातील अमर्याद लोकसंख्येस पुरेशी ठरतील अशी जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता होत नाही. झालीच तर त्यामध्ये भेसळीचे प्रमाण असते. त्याचा परिणाम नागर समाजाच्या आरोग्य व कार्यक्षमतेवर होतो. भाजीपाला, अन्नधान्य, दूध, रॉकेल, पेट्रोल, फळे इ. वस्तूंचा पुरेसा पुरवठा होत नाही. त्यातच व्यापारी वाहतूक यांचे संप अशा कृत्रिम समस्यांमुळे भाववाढ अपरिहार्य ठरते. बऱ्याच वेळ व्यापारी विशिष्ट काळात अन्नधान्य, फळे, दूध, रॉकेली कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि जनतेकडून वाटेल तेवढी किंमत उकळतात. त्यातून नागर समाजाची पिळवणूक होते. या सर्व

जीवनावश्यक वस्तूंबरोबरच गॅस, रॉकेल, जळाऊ लाकूड, कोळसा या बाबींच्या बाबतीत देखील तीच समस्या भेडसावते. रॉकेल व गॅसच्या अपुऱ्या दुखण्यामुळे लोकांना दिवस दिवसभर रांगेत उभे रहावे लागते. त्यातून नागरी समाजाची हेळसांड होते.

**१३. दारिद्र्य, गुन्हेगारी आणि वेश्यावृत्तीची समस्या -**

शहरी ही अर्थव्यवस्थेची मुख्य केंद्रे असतात व औद्योगिकरणामुळे लोकांना रोजगार संधी उपलब्ध होईल या आशेने ग्रामीण लोक शहराच्या ठिकाणी स्थलांतर करतात. परंतु शहरात मात्र उलट स्थिती जाणवते. एवढ्या मोठ्या संख्येने अनेक अकुशल व अर्धकुशल कामगारांना काम उपलब्ध असेल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे गल्लोगल्ली बेकार कामगार कामाच्या शोधात फिरताना दिसतात. दारिद्र्य ही जागतिक आणि दीर्घकाळापासून विद्यमान असलेली समस्या आहे. शहर आणि महानगरातील गलिच्छ वस्त्या हे दारिद्र्याचे लक्षण आहे. काही अभ्यासक शहरी दार्रिद्र्य हे ग्रामीण भागाचे आयातीत दारिद्र्य आहे असे मानतात. त्यांचे मते ग्रामीण भागातून अकुशल श्रमिकांचा मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरातून दारिद्र्याची समस्या जटिल झाली आहे. अपुऱ्या उत्पन्नामुळे किंवा अवाजवी खर्चामुळे एखादी व्यक्ती काम करण्यास आवश्यक ती शारीरिक व मानसिक क्षमता विशिष्ट परिस्थितीत कायम ठेवू शकत नाही. तसेच स्वतः बरोबर त्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना साधारण जीवनमान देण्यास असमर्थ ठरते. त्या परिस्थितीला दारिद्र्य म्हणतात असे गिळीत या शास्त्रज्ञाने म्हटले आहे.

दारिद्र्याचा परिणाम म्हणून गुन्हेगारीकडे पाहता येईल. शहरीकरणामुळे गुन्हेगारीत देखील वाढ होताना दिसते. त्यामध्ये गंभीर गुन्हे, साधारण गुन्हे, आर्थिक गुन्हे, यौन प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश करता येईल. बेकारी, चंगळवाद परिस्थिती अशा अन्य कारणांमुळे नागरी समाजातील तरूण वर्ग गुन्हेगारीकडे वळतो. ही

गुन्हेगारी एवढ्या व्यापक प्रमाणात आढळते की त्यावर नियंत्रण करणे पोलिस, सुरक्षा व्यवस्था व सामाजिक संघटनांना देखील अशक्यप्रत बनले आहे.

दारिद्र्य आणि गुन्हेगारी बरोबरच वेश्यावृत्ती समस्या देखील गंभीर बनत असून त्यातून विविध आजार आणि गुन्हेगारी फोफावत चालली आहे. वेश्या व्यवसायामध्ये स्त्रियांबरोबरच पुरूष वेश्यादेखील अलीकडील काळात शहरांच्या ठिकाणी दिसतात. आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी या मार्गांचा अवलंब होताना दिसतो. वेश्या वृत्तीची कारणे अभ्यासताना नागरी समाजामध्ये पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी असते. त्यामुळे अविवाहित लोक काम वासनेसाठी वेश्यागमन करतात. वेश्यागमनामध्ये भावनिक गुंतवणूक व कसलीही जबाबदारी नसते. त्यामुळे एकाकी राहणारे पुरूष त्या मार्गाकडे वळतात व त्यातून एका नवीन समस्येचा जन्म होतो. त्यातूनच 'रेड लाईट एरिया' सारखे व्यापक वेश्यागृहे, गुन्हेगारी, रोगराई इ. वाढतात. अर्थात शहरीकरणामुळे दारिद्र्य, गुन्हेगारी, वेश्यावृत्ती इ. समस्या निर्माण होतात.

**१४. करमणूक आणि मनोरंजनाच्या साधनांचा अभाव -**

माणूस कोणताही असो शहरी किंवा ग्रामीण त्याचा शारीरिक अथवा मानसिक थकवा घालविण्यासाठी मनोरंजनाची आवश्यकता असते. आजच्या शहरांमध्ये मनोरंजनाची विविध साधने उपलब्ध असताना दिसतात. त्यामध्ये चित्रपटगृहे, नाट्यगृहे, बगीचे, बालोद्यान, विविध वस्तूंचे प्रदर्शन, ग्रंथालये, वाचनालये, वस्तूसंग्रहालये इ. चा त्यामध्ये समावेश होतो. परंतू या सर्व सोई सुविधा अपुऱ्या पडतात व सर्व ठिकाणी तुडुंब गर्दी दिसते. त्यामुळे ठराविक लोकांनाच त्याचा लाभ मिळता. शहरांमधील करमणूक साधनांचे दर भरपूर असतात. ते सामान्य लोकांना परवडत नाहीत. तसेच अशी करमणूक केंद्रे, क्रीडांगणे शहरापासून दूर अंतरावर असतात. त्यामुळे तीथपर्यंत गरीब व सामान्य माणूस पोहचू शकत नाही व पर्यायाने करमणूकीच्या साधनांपासून वंचित राहतो व त्याचा परिणाम त्याच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत

असतो. त्यातूनच एकाकीपणा, मनोरंजन, ताणतणाव वाढतात. अशा प्रकारच्या समस्या मनोरंजनाच्या साधनाअभावी निर्माण होतात.

**समारोप -**

नागरीकरण ही आधुनिक काळातील न टाळता येणारी अशी आवश्यक बाब बनली आहे. ज्या अर्थी नागरीकरणामुळे देशाच्या प्रगतीचे मोजमाप होते. तसेच विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. त्या अर्थी नागरीकरण म्हणजे एक प्रकारची इष्टापत्तीच म्हणावी लागेल.

**संदर्भ -**

१. घारपुरे विठ्ठल - सामाजिक व सांस्कृतिक भूगोल, पृ. ६८.

२. खडसे भा.कि. - भारतातील सामाजिक समस्या, पृ. ६६.

३. घारपुरे विठ्ठल - उपराल्लेखित, पृ. ६७.

४. खडसे भा. कि. - उपरोल्लेखित, पृ. ६७.

५. वैद्य वसंत - भारतीय सामाजिक समस्या, पृ. १५.

६. खडसे भा. कि. - उपरोल्लेखित, पृ. ६९.

७. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. ६५.

८. भांडारकर पु. ल. - समाजशास्त्रीय सिद्धांत, पृ. ३५६.

९. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. ६६.

१०. खडसे भा. कि. - उपरोल्लेखित, पृ. ६८.

११. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. ६५.

१२. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. ६६.

१३. वैद्य वसंत - भारतीय सामाजिक समस्या, पृ. १५-१६.

१४. भांडारकर पु. ल. - समाजशास्त्रीय सिद्धांत, पृ. ३६७.

१५. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. १०९.

१६. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. १२०.

१७. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. ११९.

१८. वैद्य वसंत - उपरोल्लेखित, पृ.१२५.

१९. भांडारकर पु. ल. - उपरोल्लेखित, पृ. ३६७.

२०. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. १७३.

२१. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. ११३.

२२. भांडारकर पु. ल. - उपरोल्लेखित, पृ. ३७४.

२३. घारपुरे विठ्ठल - उपरोल्लेखित, पृ. १२०.

२४. भांडारकर पु. ल. - उपरोल्लेखित, पृ.२९२-२९३.

२५. भांडारकर पु. ल. - उपरोल्लेखित, पृ. २८९.

२६. खडसे भा. कि. - उपरोल्लेखित, पृ. २०१.

२७. बोंगाळे शोभा - शहरीकरणाच्या समस्या आणि नगरपालिकेचे राजकारण, एम्.फिल. प्रबंध, पृ. १६.

२८. नाडगोंडे गुरूनाथ - उपरोल्लेखित,पृ. १८५.

२९. बोंगाळे शोभा -उपरोल्लेखित, पृ. १६.

३०. नाडगोंडे गुरूनाथ - उपरोल्लेखित, पृ. ६९.

३१. नाडगोंडे गुरूनाथ - उपरोल्लेखित, पृ. १८७.